जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) मे. जय एन्टरप्राईजेस तर्फे भागीदार श्री. जयेश विनयचंद दोशी आणि २) मे. शुभ असोसिएटस् तर्फे भागीदार श्री. जयेश विनयचंद दोशी यांच्या मालकीचे गाव मौजे : डोंगरे, तालुका : वसई, जिल्हा पालघर येथील खालील "परिशिष्ट"मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत असून, महसूल कागदोपत्री ७/१२ उताऱ्या सदरी त्यांची नावे मालक म्हणून दाखल आहेत. सदर जमिन मिळकतीत बांधकाम करण्याची परवानगी मिळविणेकरीता माझ्या अशिलांनी वसई - विरार शहर महानगरपालिका यांचे कार्यालयात अर्ज केलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था वा अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हरकत किंवा हितसंबंध असल्यास अगर कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह व लेखी पुराव्यानिशी पत्ता :- रिलायबल प्रेस्टीज, पहिला मजला, आय.डी.बी. आय. बँकेच्या वरती, आचोळे रोड, नालासोपारा (पूर्व), ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०९ या पत्यावर कळवावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत नाही असे गृहित धरून पुढील कारवाई केली जाईल आणि नंतर आलेल्या तक्रार वा हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

जमिन मिळकतीचे वर्णन

गाव मौजे : डोंगरे, तालुका : वसई, जिल्हा : पालघर

अनु क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पै.	जमीन मालकाचे नाव
१.	१/अ/२	१/१	०-८४-८६ यापैकी क्षेत्र ०-४४-८७	३.०५	मे. जय एन्टरप्राईजेस
२.	१/अ/२	१/१	०-८४-८६ यापैकी क्षेत्र ०-३९-९९	३.०५	मे. शुभ असोसिएटस्

सही/-

ॲड. गौरव प्रकाश पै.

जाहीर सूचना

सूचना घ्यावी की, माझे अशील परिशिष्टात नमूद ऑफिस युनीट खरेदी करण्यास इच्छुक आहेत. कोणतीही व्यक्ती ज्यांना सदर मिळकतीच्या संदर्भात कोणताही दावा किंवा हक्क जसे की, विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, बक्षीस, विश्वस्त, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार किंवा अन्य काही असल्यास त्यांनी सदर निम्नस्वाक्षरीकारांना या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ दिवसांच्या आत पुष्ठ्यर्थ लेखी सर्व दस्तावेजांसह कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तशा दाव्यांच्या संदर्भाशिवाय व्यवहार पूर्ण केले जातील आणि तशा व्यक्तींचे दावे जर असल्यास, ते त्यागित समजले जातील आणि आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील संदर्भित परिशिष्ट :

युनिट क्र. ३१, तळ मजला, प्लॅटिनम इमारत, प्लॉट क्र. ७, जवाहर रोड, घाटकोपर(पूर्व), मुंबई ४०० ०७७.

१७ मार्च, २०२४ रोजीस

देवेंद्र बी.सिंग, एल.एल.एम.
स्यु–जेनेरिस,
वकील आणि कायदेशीर कंसल्टन्ट
२१३, पटेल शॉपिंग सेंटर,
साईनाथ रोड, मालाड (प), मुंबई ४०० ०६४
९२२३२८१७८९, **mdevlaw@gmail.com,**

स्टेट बँक ऑफ इंडिया

रिटेल ॲसेट सेन्ट्रलाईझ्ड प्रोसेसिंग सेंटर, बोरिवली

एलिगंट कॉर्नर, गुरु तपस्या सीएचएस लि., ६२०/४, कस्तुरी पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०००९२

लिलाव सूचना

जे आहे जेथे आहे आणि जे आहे जसे आहे तत्वाने वाहनाचे

आम्ही कर्जदारांकडून खाते जे आहे जेथे आहे आणि जे आहे जसे आहे तत्वाने वसुलीकरीता जप्त केलेल्या वाहनांकरीता ऑफलाईन लिलाव विक्रीकरिता मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. **लिलाव २६.०३.२०२४ रोजीस होईल. प्रत्येक बोली रु. ५०००.०० फक्त च्या पटीत वाढवली जाईल.** उच्चतम बोली प्रस्ताव वाहनाच्या विक्रीकरिता विचारात घेण्यात येतील. उच्चतम बोलीदाराने लिलावापासून ३ कामकाजाचे दिवसात प्रस्ताव रकमेच्या उर्वरित रक्कम जमा करणे आवश्यक आहे, कसूर केल्यास इअर जप्त करण्यात येईल. वाहन दंड टाळण्यासाठी प्रस्ताव रक्कम प्रदान केल्यानंतर त्वरित हलवणे आवश्यक आहे.

एसबीआयने कोणतेही कारण न देता लिलाव किंवा निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला आहे. वाहनांच्या **निरिक्षणाकरिता उल्लेखित यार्ड मध्ये दिनांक २२.०३.२०२४ रोजी उपलब्ध असेल.**

इच्छुक पक्षकारांनी निविदा सह राखीव किंमतीच्या १०% इसारा अनामत रक्कम स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नावे डिमांड ड्राफ्टसह स्वस्वाक्षांकीत पॅनकार्ड आणि आधार कार्डच्या प्रतीसह सादर कराव्यात, त्या २२.०३.२०२४ रोजीस सायं. ६.०० पर्यंत स्विकारल्या जातील. निविदा प्रपत्र वरील उल्लेखित पत्यावरुन प्राप्त करुन भरुन आमच्या कार्यालयात सादर करावेत. बँकेने जप्त केलेल्या खालील नमूद कार्स या **'जे आहे जेथे आहे'** आणि **'जे आहे जसे आहे तत्त्वाने'** विक्रीसाठी आहेत. ज्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

अनु क्र.	कर्जदाराचे नाव	कार क्र.	नोंदणी दिनांक	मेक/मॉडेल/ निर्मिती वर्ष	किमान राखीव किंमत	इसारा अनामत रक्कम १०%	आरसी स्टेटस
१	श्री. शिंजु शनमुगन थिंडियिल	एमएच-०४-केएल-५५५४	जून २०२०	हुंदाई आय-२० स्पोर्ट्स + व्हीटीव्हीटी (पेट्रोल)	रु. ५,१०,०००/-	रु. ५१,०००/-	नाही

वाहन पार्क येथे: अभिषेक अपार्टमेंट, सेंट जोसेफ हाय स्कूल समोर, शांती पार्क, मिरा रोड, पूर्व ४०११०७.
संपर्क – हर्ष सिंग – ९६६४९७१६०८
ठिकाण : मुंबई दिनांक : १६.०३.२०२४

प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया

प्रत्यक्ष कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्रमांक २०१-बी, २ रा मजला, रोड क्र. १, प्लॉट क्र. बी-३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र-४०० ६०४.

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२, कलम १३ (१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदारांस सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा त्याला/तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रूल्सच्या नियम ८ अन्वये खालील नमूद तारखेस घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या भाराअधीन राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	मिळकतीचे वर्णन/ प्रत्यक्ष कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रू.)	शाखेचे नाव
१.	स्वाती नाना सोनावणे/सोनावणे नाना बारकु/ एलबीएमयुएम००००४३०५७७१	फ्लॅट क्र. ३०२, ३रा मजला, ए विंग, दिप आशिष सीएचएस लि. कुळगाव तालुका अंबरनाथ, ठाणे-४२१५०३/१२ मार्च, २०२४	जून २५, २०२१ रु. २०,९८,३४३.००/-	मुंबई
२.	राजेश मैकुलाल कनोजीया/उषादेवी राजेश कनोजीया/ एलबीएमयुएम००००५१७७६९३	फ्लॅट क्र.१०४/बी विंग, १ला मजला, इमारत ०२, कॉसमॉस पॅराडाईज, पालघर, बोईसर पश्चिम, गट क्र.१११ पालघर-४०१५०१/१३ मार्च, २०२४	सप्टेंबर २१, २०२१ रु. १७,७९,१४६.००/-	पालघर
३.	श्रीकांत जी पाटील/ गुलाबराव बाजीराव पाटील/ एलबीएनएमयु००००२४४६९९३/ एलबीएनएमयु००००२४४६९९२	फ्लॅट क्र.०२, तळ मजला, कृष्णा इमारत, ओस्टवाल वंडर सीटी, गाव बेतेगाव, ब्लॉक क्र ३, बोईसर पूर्व, महाराष्ट्र, ठाणे-४०१४०४/१३ मार्च, २०२४	जुलै ०६, २०२१ रु. १७,५६,३४८.००/-	ठाणे

वरील नमूद कर्जदार/हमीदारांस याद्वारे ३० दिवसांत रकमेचा भरणा करण्यास सूचना देण्यात येत आहे, अन्यथा गहाण मिळकती सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीं अंतर्गत सदर सूचना प्रकाशनाच्या ३० दिवसांच्या समाप्तीनंतर विकण्यात येतील.

दिनांक : मार्च १६, २०२४
स्थळ : महाराष्ट्र

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय बँक लिमिटेड

AXIS BANK LTD.

नोंदणीकृत कार्यालय :- ॲक्सिस बँक लि., ''त्रिशुल'', 3रा मजला, समर्थेश्वर मंदीर समोर, लॉ गार्डन एलिब्रिज जवळ, अहमदाबाद - 380006.
शाखेचा पत्ता - ॲक्सिस बँक लि., तिसरा मजला, गिगाप्लेक्स, एनपीसी -1, टीटीपी इंडस्ट्रीअल एरिया, मुगलासन रोड, ऐरोली, नवी मुंबई - 400708.

(नियम ८(१) ताबा सूचना

ज्याअर्थी, खाली सही करणार ॲक्सिस बँक लि, चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने वित्तीय प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि प्रतिभूती अंमलबजावणी अधिनियम 2002 च्या अंतर्गत तसेच प्रतिभूती हिताधिकार (येथे ''सांगित कायदा'' म्हणून संदर्भित) आणि सुरक्षा हित (अमलबजावणी)नियमावली 2002 च्या (नियम 3) सह वाचल्या जाणा-या कलम 13(12) अंतर्गत खाली नमूद केलेल्या कर्जदार/गहाणदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या एकूण थकबाकीची परतफेड करण्याची 13 (2) मागणी सूचनेनुसार 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना दिली होती.

खाली नमूद कर्जदार/जमानतदार/गहाणदार यांनी खालील नमूद रक्कमेची परतफेड न केल्यामुळे एतद् व्दारा खाली नमूद कर्जदार/जमानतदार/गहाणदार/जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की खालील सही करणा-यांनी उक्त नियमावली सह वाचल्या जाणा-या आणि उक्त अधिनियमाच्या कलम 13 उपकलम (4) च्या सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स 2002 अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन बँकेस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा सांकेतिक ताबा बँकेने घेतला आहे.

विशेष करुन कर्जदार आणि सर्व सामान्य जनतेला एतद् व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता ताकीद दिली जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे ॲक्सिस बँक लि,. व्याजासह इतर प्रभाराधिन राहील.सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 मधील उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कर्जदाराचे विशेष लक्ष आमंत्रित केले आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार /जामीनतदाराचे नाव व पत्ता	थकबाकी रक्कम रु.	मागणी सूचनेची तारिख / ताब्याची तारिख	स्थावर मालमत्तेचे वर्णन
1.	1) जैनम समीर मेहता (कर्जदार/ गहाणदार), 2) पारुल समीर मेहता (सह-कर्जदार/ गहाणदार) चंद्रिका मेहता (सह-कर्जदार/गहाणदार) लोन खाता नं. PHR057304809311	रु. 6783698/- (रुपये सदुसष्ठ लाख त्र्याऐंशी हजार सहाशे अठ्ठयाण्णव फक्त) 11.07.2023, रोजी देय रक्कम आणि त्यावरील पुढील व्याजासह कराराच्या दराने तसेच पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंतचे सर्व खर्च, शुल्क आणि खर्च	05.08.2023 15-03-2024	फ्लॅट नं. 401, चौथा मजला, चारकोप सिद्धार्थ हाऊसिंग, प्लॉट नं. 223, रोड नं. आरडीपी- 8, सेक्टर नं. 3, चारकोप कांदिवली (पश्चिम) मुंबई 400067 क्षेत्रफळ बिल्ट अप एरिया :- 920 चौ.फुट

दिनांक : 15.03.2024
ठिकाण : मुंबई

(मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.)

अधिकृत अधिकारी,
ॲक्सिस बँक लि.

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९, भारत.

शाखा कार्यालय : २ रा मजला, सोनावणे कॉम्प्लेक्स, कामदार पेट्रोल पंप बाजूला, मिनी मार्केट, मेन रोड, लातूर ४१३५१२

(नियम ८ (६) साठी परंतुके पहा)

स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) चे परंतुकान्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

विशेषतः सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा **प्रत्यक्ष कब्जा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारस यांचे नाव कर्ज खाते क्र.	तारण मत्तेचा तपशील सह काही असल्यास ज्ञात भार	थकीत रक्कम	राखीव किंमत / इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	बालाजी अर्जुन जाधव (कर्जदार) लक्ष्मीबाई अर्जुन जाधव (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएलएटी००००१३६३९३१	प्लॉट क्र. २१६, जुना सर्व्हे क्र. ३७९, नवीन गट क्र. ३९०, कसबे ओमेर्गा, तालूका ओमेर्गा, जि. लातूर, राज्य महाराष्ट्र ४१३५०६	रु. १६,५९,४३१/- मार्च १३, २०२४	रु. ७,७७,६००/- रु. ७७,७६०/-	एप्रिल १५, २०२४ स. ११:०० - दु. ०३:००	एप्रिल २३, २०२४ दु. ०२:०० - दु. ०३:००

ऑनलाईन लिलाव हा लिलाव एजन्सी **ग्लोब टेकची** वेबसाईट **(युआरएल लिंक-https://BestAuctionDeal.com)** वर करण्यात येईल. गहाणदार/नोटीसी यांना **एप्रिल २२, २०२४ रोजी सायं.** ०५.०० पूर्वी पर्यंत पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे, अन्यथा तारण मत्ता वरील वेळापत्रकाप्रमाणे विकण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, सोनावणे कॉम्प्लेक्स, कामदार पेट्रोल पंप बाजूला, मिनी मार्केट, मेन रोड, लातूर ४१३५१२** येथे इसारा अनामत रक्कम (इअर) आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई मध्ये उल्लेखित) **एप्रिल २२, २०२४ किंवा पूर्वी दु. ०४.०० पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी प्रपत्राची स्वाक्षांकित प्रत आणि बोली, अटी आणि शर्तीचे प्रपत्र **एप्रिल २२, २०२४ किंवा पूर्वी सायं. ५.०० पूर्वी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, २ रा मजला, सोनावणे कॉम्प्लेक्स, कामदार पेट्रोल पंप बाजूला, मिनी मार्केट, मेन रोड, लातूर ४१३५१२** येथे सादर करावी. इसारा अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डीडी) लातूर येथे देय **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.-लिलाव** च्या नावे नॅशनलाईज्ड/शेड्युल्ड बँकेवरील असणे आवश्यक आहे.

निरिक्षण, लिलावाच्या अटी आणि शर्ती किंवा निविदा सादर करण्याच्या संदभातील पुढील कुठल्याही स्पष्टिकरणासाठी कृपया ९९२०८०७३०० वर **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** यांना किंवा आमचे **सेल्स आणि मार्केटिंग पार्टनर नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांना संपर्क करावा.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता कोणातीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया **https://www.icicihfc.com/** यावर भेट द्या.

दिनांक: मार्च १७, २०२४
ठिकाण: लातूर

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

The spirit of Mumbai is now 95 years old!
THE FREE PRESS JOURNAL
www.freepressjournal.in

जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, गांव मौजे कामण, तालुका वसई, जिल्हा पालघर येथिल सर्व्हे नं. १२४, हिस्सा नं. –, क्षेत्र ५-७३-४० हे. आर. चौ. मी., पो. ख. २-३८-०० हे. आर चौ. मी. आकार रू. पै. ०.००, हयापैकी क्षेत्र ११९३ चौ. मी. जमीन मिळकत ज्याचा प्लॉट नं. ३, एस–०७–१ व एस–०७–२ असून ही जमीन मिळकत श्री. हरपालसिंग जागरसिंग गुप्ता व सौ. रूपींदरकौर हरपाल सिंग गुप्ता हयांचे मालकी कब्जेवहीवाटीची व उपभोगाची असून सदर जमीन मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीवर कुणाही इसमाचा अथवा संस्थेचा वारसाहक्क, अधिकार, विकी, हितसंबंध, दावा, गहाण, दान, तारण, भाडेपटटा इत्यादी असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर १४ दिवसांचे आंत निम्नस्वाक्षरीकाराच्या आदीत्य होंडा सर्विस सेंटरच्या समोर, गोखिवरे, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर ४०१२०८ हया पत्यावर लेखी कळवावे अन्यथा कुणाचाही तसा हक्क हितसंबंध नाही असे समजून व्यवहार पुर्ण केला जाईल हयांची कृपया नोंद घ्यावी.

ॲड. राकेश नाना भोईर

जाहीर नोटीस

गांव मौजे मोरी,तालुका वसई,जिल्हा पालघर येथील स.नं. ३८ हि. नं. १ क्षेत्र ०.२५.३० ही मिळकत जमिन मालक मनिष सुभाषचंद्र मेहरा, सुरेश वसंत पाटील यांनी आमचे अशिलांना कायम विकत देणेचे मान्य व कबुल केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कब्जा, कोर्टदरबार, करार, वारसा वा अन्य हक्क हितसंबंध असलेस त्यांनी तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पूराव्यानिशी कळवावी अन्यथा तसा कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असलेस तो सोडुन दिला आहे असे समजुन सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल.

श्री. गिरीधर रा. म्हात्रे. वकील
ऑफीस पत्ता : चंद्रपाडा, पो. जूचंद्र, चंडीका मातेच्या मंदीराजवळ,ता. वसई, जि. पालघर.
मो. नं. ९३२६४४३१२१

TMB Tamilnad Mercantile Bank Ltd

तामिळनाड मर्कंटाईल बँक
ठाणे शाखा: दुकान क्र. ४-६, लॅण्डमार्क आर्केड,
इस्टर्न एक्स्प्रेस हायवे सर्व्हिल रोड,
नितिन कंपनी जवळ, लुईसवाडी, ठाणे (पश्चिम),
महाराष्ट्र-४००६०४.

तारण सोने (गहाण) शी संबंधित जाहीर लिलाव विक्री

सर्व जनतेला सदर कळविण्यात येते की, सोने दागिणे गहाण ठेवुन सदर बँकेकडुन घेतलेले थकीत सोने गहाण कर्ज पूर्ण भरलेले नाही. जाहीर लिलावाने अशा थकीत दागिण्याची विक्री **शुक्रवार, २२.०३.२०२४ रोजी दु. ३.०० वा.** करण्यात येणार आहे. विक्री करावयाचे दागिणे बँकेच्या कार्यालयात लिलावाच्या वेळी पाहता येतील. तसेच अटी आणि शर्ती सुध्दा त्या संदर्भात उपलब्ध होतील. जर कर्ज रक्कम २२.०३.२०२४ **रोजी दु. ३.०० वा.** पूर्वी अदा केली तर लिलावा तहकुब करण्यात येईल.

बँकेने बँकेकडे नोंदणीकृत पत्त्यावर थकीत सोने कर्ज कर्जदारांना वेळोवेळी सूचना जारी केल्या आहेत आणि त्याची पोच संबंधित शाखेकडे आहे. थकीत सोने कर्ज कर्जदारांचे नाव आणि पत्ता खाली दिलेला आहे, जे सांगतात की त्यांना प्राप्त झालेली नाही. त्यांनी सदर सूचना ही वैयक्तीक सूचना समजावी आणि जाहीर लिलावाकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी प्रदान करण्याची विनंती करण्यात येत आहे. बँकेने अपेक्षेप्रमाणे किंवा कोणत्याही तांत्रिक कारणाने दागिण्यांची किंमत मिळत नसेल तर लिलाव थांबवुन ठेवण्याचा हक्क राखुन ठेवला आहे.

अ. क्र.	खाते धारकाचे नाव आणि पत्ता	कर्ज खाते क्र.	तारण सोने दागिण्याचे वजन (ग्राम्स)	कर्ज रक्कम रु.त
१	श्रीम. अनिता दिनकर खनकाळ खोली के. १०६, सी विंग, सिध्दिविनायक अपार्टमेंट, ठाणे भिवंडी रोड, जाईमाता दि कॉम्प्लेक्स, कशेळी, ठाणे- महाराष्ट्र-४२१३०२	४६८७००२५०१०५५९३	८.३० ग्राम/ (रिंग-२)	रु. ३३,७७९.७६

ठिकाण : ठाणे
दिनांक : १७.०३.२०२४

सही/ – शाखा अधिकारी
तामिळनाड मर्कंटाईल बँक लि., ठाणे

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

कॅनरा बँक, विरार पश्चिम २ शाखा,
पत्ता: दुकान क्र. १ ते ५, शॉपर्स प्लाझा,
लोकप्रभात कॉम्प्लेक्स, अगाशी रोड, बोळींज,
विरार पश्चिम ४०१३०३

शाखा संदर्भ: CB/15483/RAHIMKARIMRAMANI
दिनांक : – १४/०३/२०२४

कब्जा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकर्ता हे कॅनरा बँकेचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट ५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३ (२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२२-०९-२०२३ (२२ सप्टें. २०२३)** रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार **श्री. रहीम करीम रामाणी सी ओ करीम एन रामाणी,** राहणार ए १७, नुतन सोसायटी एमआयजी १ म्हाडा कॉलनी, शांती गार्डन जवळ, मीरा रोड, मुंबई - ४०११०७ यांना सूचनेतील नमूद रक्कम **रु. ३२,६९,९१५.६०/- (रुपये बत्तीस लाख एकोणसत्तर हजार नऊशे पंधरा आणि पैसे साठ मात्र)** अधिक न लावलेले व्याज आणि प्रभार या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील वर्णिलेल्या मिळकतींचा कब्जा त्याला/तिला सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर रुलसच्या नियम ८ आणि ९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **१४ मार्च, २०२४** रोजी घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा कॅनरा बँक, विरार २ बोळींज शाखेच्या रु. **३२,६९,९१५.६०/- (रुपये बत्तीस लाख एकोणसत्तर हजार नऊशे पंधरा आणि पैसे साठ मात्र)** अधिक त्यावरील व्याज रकमेच्या भाराअधीन राहील.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. २०३, २रा मजला, बी विंग, टाइप ए१, इमारत क्र. ६ (श्रध्दा), अमृत रेसिडेन्सी, गाव सारवली, दीप एज्युकेशन कॅम्पस् जवळ, सारवली, पालघर - ४०१५०१. श्री. रहीम करीम रामाणी यांच्या नावे असलेला.

सीमाबद्धतेने:

उत्तरेकडून: पॅसेज	दक्षिणेकडून: ओपन
पूर्वेकडे: फ्लॅट क्र. २०१	पश्चिमेकडून: फ्लॅट क्र. २०२

नोंदणी उपजिल्हा: वसई-विरार शहर, पालघर

दिनांक : १४/०३/२०२४
स्थळ : विरार पश्चिम

सही/–
प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

इंडियन ओव्हरसीज बँक

प्लॉट क्र. १०, पितृछाया बिल्डिंग, एच. एफ. सोसायटी
रोड, जोगेश्वरी पूर्व, मुंबई-४०००६०
iob0330@iob.in, ०२२ २८२४ ६३७२, २८३८ ३१५७

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) साठी परंतुकांच्या अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा अन्वयिक/प्रत्यक्ष कब्जा (जे प्रयोज्य असेल ते) इंडियन ओव्हरसिज बँक, तारण धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती कर्जदार **श्री. प्रकाश हिरामन मारु, मे. मारु एंटरप्रयझेसचे प्रोप्रायटर, दुकान क्र. २४, निर्मल नगर सीएचएस लि., साई बाबा नगर, मिरा भाईंदर रोड, जिल्हा ठाणे- ४०११०७.** (कर्जदाराचे नाव आणि पत्ता नमुद) **श्री. पल्केश अगरवाल, ३३, शिवाली हाऊसिंग सोसायटी लि., गोकुळ व्हिलेज, शांती पार्क, मिरा रोड पूर्व, ठाणे ४०११०७ .** (हमीदाराचे नाव आणि पत्ता नमुद) यांचेकडुन इंडियन ओव्हरसिज बँक, तारण धनकोंना थकीत ०७.०९.२०१८ रोजीस **रु. ८५,१९,८३३.२६ (रुपये पंच्याऐंशी लाख एकोणतीस हजार आठशे तेहेतीस आणि पैसे सव्वीस मात्र)** च्या विक्रीकरिता ०३.०४.२०२४ (विक्रीची तारीख नमुद) रोजी **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने त्या विकण्यात येणार आहे.

राखीव किंमत **रु. १७.०१ लाख (रु. सतरा लाख एक हजार मात्र)** आणि इसारा अनामत रक्कम **रु. १,७०,१००/- (एक लाख सत्तर हजार शंभर मात्र)** राहील.

स्थावर मिळकतीचे वर्णन

(काही असल्यास ज्ञात भारांसह सीमांसह स्थावर मिळकतीचा संपूर्ण तपशिल)

तारण मत्तेचे परिशिष्ट

श्री. प्रकाश हिराराम मारु यांच्या नावे फ्लॅट क्र. जी/१, तळ मजला, श्री दत्तात्रय को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., कृष्णस्थल कॉम्प्लेक्स, प्लेझंट पार्क/डॉन बॉस्को स्कूल लगत, मिरा भाईंदर रो, मिरा रोड, गाव मिरे, वॉर्ड क्र. क्यु, डिव्हिजन क्र. ५/२२ (पूर्व), ठाणे- ४०११०४ समाविष्ट मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग. खालीलप्रमाणे सीमाबध्द:

पूर्व- ओपन प्लॉट/ अमि पार्क,	पश्चिम- कृष्णस्थल कॉम्प्लेक्स,
उत्तर- सरस्वती टॉवर,	दक्षिण- रस्ता

* स्थानिक स्वराज्य संस्थेची थकबाकी (मिळकत कर, जल नि:स्सारण, वीज बिल्स इ.)
* वैधानिक थकबाकीपेक्षा बँकेच्या थकबाकीला प्राधान्य आहे.

(तेथे अधिक मिळकती असल्यास वरील तपशिलासह नमुद कराव्यात)

ई-लिलावाची तारीख आणि वेळ: https://www.mstcecommerce.com/ autionhome/ibapi च्या प्लॅटफॉर्मवर विक्री पूर्ण होईपर्यंत प्रत्येकी ५ मिनिटांच्या आपोआप विस्तारासह **०३.०४.२०२४ (तारीख)** रोजी **दु. ३.०० ते सायं. ५.०० (वेळ)** दरम्यान.

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरीता सेवा पुरवठादारांची लिंक https://www.mstcecommerce.com/ autionhome/ibapi किंवा बँकेची बेबसाईट http://www.ibapi.in चा संदर्भ घ्यावा.

ठिकाण : जोगेश्वरी
दिनांक : १६.०३.२०२४

प्राधिकृत अधिकारी

जाहीर नोटीस

सदर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, गावमौजे : सालोली, तालुका व पोटतुकडी : वसई, जिल्हा व तुकडी : पालघर येथील सर्वे नंबर ४७, हिस्सा नंबर १९, एकूण क्षेत्र ००–१६–२० हे. आर. पैकी ०–०३–३० हे. आर., आकारणी रु. १.०२ पैसे व सर्वे नंबर ४७, हिस्सा नंबर १७, एकूण क्षेत्र ००–०८–३० हे. आर. पैकी ०–०३–०० हे. आर., आकारणी रु. ०.९३ पैसे अशी एकूण ०–०६–३० हे. आर. या वर्णनाची जमिन मिळकत व त्यावरील घर मिळकत बंगला नं. ११३, क्षेत्र ३७५३ चौ. फुट ज्याची वसई विरार शहर महानगरपालीका दप्तरी मालमत्ता क- SA01/93 अशी नोंद आहे. अशी जमिन व घर मिळकत माझे प्रक्षकार श्री. चार्ल्स जॉन उर्फ जांबू डाबरे हयांच्या मालकीची असून बॅसीन कॅथोलिक को.ऑप. बँक लि., वसई (बीसीसीबी) कडे गहाण आहे. माझे वरील अशिल हे सदर बीसीसीबी बँकेचे थकबाकीदार झाल्याने त्यांनी सदर बँकेचे कर्ज परतफेड करण्यासाठी सदर मिळकत श्री. प्रकाश कुमार सुरेश रूखायर, यांना दि. ३१-१२-२०२० रोजीच्या करारनाम्याअन्वये विकत देण्याबाबतचा करार केला होता. सदर करारनामा वसई येथील दु. नि. कार्यालय वसई ५ यांचे कार्यालयात दस्त क. ५३९/२०२१ अन्वये दि. १५-०१-२०२१ रोजी नोंदणीकृत करण्यात आला होता. परंतू सदर करारनाम्यात नमुद मोबदला रक्कम मागणीनुसार श्री. प्रकाश कुमार सुरेश रूखायर हे वारंवार माझे अशिलांना अथवा बीसीसीबीला परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने त्यांचा सदर मिळकतीमध्ये कोणताही हक्क अथवा हितसंबंध राहीलेला नाही. त्यामुळे माझे अशिल दि. ३१-१२-२०२० रोजीचा वरील करारनामा प्रस्तुतच्या नोटीशीद्वारे रद्द करीत आहेत. व त्यासाठी योग्य त्या कायदेशीर प्रकीयेचा अवलंब देखील करणार आहेत. सबब, सदर मिळकतीबाबत कोणीही श्री. प्रकाश कुमार सुरेश रूखायर हयांच्याशी कोणताही व्यवहार करू नये, व केल्यास, सदर व्यवहार माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १७-०३-२०२४

सही/–

ॲड. जॉर्ज लॉरेन्स फरगोज

कार्या. फ्लॅट नं. ओ/१०३, पहिला मजला, सागरपार्क को. ऑप. हौ. सो. लि., सागरशेत पेट्रोलपंपा समोर, सागरशेत, वसई गाव, वसई (प.), ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१ २०१.

जाहिर नोटीस

हया नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, गांव मौजे आडणे, ता. वसई, जि. पालघर येथील जमिन मिळकत स. नं. ९८, हि. नं. २/२, क्षेत्र ६-११-० (हे आर), पो. ख १-२६-०, एकूण क्षेत्र (हे आर) ७-३७-०, आकार ३-८८ (रु. पैसे) यास यापुढे 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आलेले आहे. सदर मिळकत किशोर मावजी शाह यांच्या मालकीची असून सदर मिळकतीबाबत आमचे अशील मनीष सुरेश सोपारकर व इतर यांनी मनाई हुकुमासाठी मे. दिवाणी न्यायालय वसई यांचे कोर्टात रे. मु. नं ६५/२०२४ अन्वये दिवाणी दावा दाखल असून सदरचा दावा प्रलंबीत असल्याने सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यात येवू नयेत, केल्यास बेकायदेशीर ठरेल याची नोंद घ्यावी.

हुकुमावरून,

ॲड. मुकेश जे. संगानी

५०२, पाचवा मजला, गंजावाला रेसिडेन्सी गंजावाला लेन, बोरीवली प, मुंबई ४०००९२.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल शेठ नारनदास धनजी धरमशी वाडी ट्रस्ट यांच्या मालकीचे गाव मौजे : डोंगरे, तालुका : वसई, जिल्हा पालघर येथील सर्व्हे नं. १/अ/२, हिस्सा नं. १/४, क्षेत्र ०-२५-०० हे.आर., आकारणी ०.९० रू. पै. ही जमीन मिळकत असून, महसूल कागदोपत्री ७/१२ उताऱ्या सदरी त्यांचे नाव मालक म्हणून दाखल आहे. सदर जमिन मिळकतीत बांधकाम करण्याची परवानगी मिळविणेकरीता माझ्या अशिलांनी वसई - विरार शहर महानगरपालिका यांचे कार्यालयात अर्ज केलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था वा अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हरकत किंवा हितसंबंध असल्यास अगर कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांसह व लेखी पुराव्यानिशी पत्ता :- रिलायबल प्रेस्टीज, पहिला मजला, आय.डी.बी. आय. बँकेच्या वरती, आचोळे रोड, नालासोपारा (पूर्व), ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०९ या पत्यावर कळवावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत नाही असे गृहित धरून पुढील कारवाई केली जाईल आणि नंतर आलेल्या तक्रार वा हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-

ॲड. गौरव प्रकाश पै.

इन्सोल्व्हेन्सी ॲड बँकरप्टसी कोड, २०१६ च्या तरतुदीअन्वये वास इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत कंपनी) च्या प्रकरणात दावे मागविणारी साठी १३ मार्च, २०२४ रोजीस प्रकाशित प्रपत्र ''ए'' मधील जाहीर उद्घोषणासाठी शुद्धिपत्रक

कॉर्पोरेट कर्जदाराच्या प्रकल्प विशेष ई-मेल आयडीमध्ये बदल

सदर १४ मार्च, २०२४ रोजी वास इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची वेबसाईट वर/वृत्तपत्र फ्री प्रेस जर्नल आणि नवशक्ति, मुंबई आवृत्ती मध्ये प्रकाशित सीआयआरपी अंतर्गत मे. वास इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या प्रकरणात प्रपत्र ''ए'' मधील दावे मागविणारी जाहिरात (''मुख्य जाहीरात'') च्या संदर्भात आहे. ह्या संदर्भात काही तांत्रिक अडचणीमुळे अंतरिम निराकरण व्यवसायिक याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, अनु. क्र. १० आणि जाहीर उद्घोषणाच्या टीपामध्ये नमूद केलेल्या प्रकल्प विशेष ई-मेल आयडी, आणि सदर "cirpvas@yahoo.com" च्या ऐवजी "cir.vasinfra@gmail.com" म्हणून वाचायचे.

पुढे, स्टेकहॉल्डर्सना विनंती आहे की, तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी अनु. क्र. ९ मध्ये नमूद आरपीच्या वैयक्तिक ईमेल आयडीकडे कोणत्याही पत्रव्यवहारामध्ये प्रत चिन्हांकित करावे.

सदर जाहीर उद्घोषणाच्या इतर मजकुर जशाच तसा राहील.

दिनांक: १६ मार्च, २०२४
ठिकाण: मुंबई

अशोक कुमार गोलेच्छा
अंतरिम निराकरण व्यवसायिक
आयबीबीआय/आयपीए-००२/आय-एन०००९३२/२०१९-२०२०/१२९७३
वास इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

महावितरण

ई-निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१७०, टी-१७१, टी-१७२, टी-१७३ आणि टी-१७४/(२०२३-२४) अशा एकुण सहा निविदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. १६.०३.२०२४ पासून ते दि. २१.०३.२०२४ पर्यंत उपलब्ध राहतील व निविदा भरण्याची अंतिम तारीख दि. २२.०३.२०२४ ला दुपारी १:०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / तारखा / इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केले जाईल.

सही/-
कार्यकारी अभियंता (स्था.)
स्थापत्य विभाग, भांडुप

यूनियन बैंक Union Bank of India

युनियन सेक्टर १५ शाखा, पीकेसी हॉस्पिटल इमारत, प्लॉट क्र. ५७, प्लॉट क्र. ५७, सेक्टर १५ए, वाशी, नवी मुंबई- ४००७०५. **ईमेल:** ubin0907081@unionbankofindia.bank

परिशिष्ट IV कब्जा सूचना (नियम-८(१)) (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता, **युनियन बँक ऑफ इंडिया,** वाशी सेक्टर १५ शाखा ०७०८२ चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **१०.०१.२०२४ रोजी** जारी करून **कर्जदार श्री. प्रविण नारायण सुर्वे आणि श्री. प्रशांत नारायण सुर्वे** यांना सदर सूचनेत नमूद रक्कम रु. **५,०४,१६९.९४ (रुपये पाच लाख चार हजार एकशे एकोणसत्तर आणि चौऱ्याण्णव मात्र) ०५ जून २०२३** रोजीस आणि त्यावरील व्याज या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० **दिवसांत** करण्यास सांगितले होते.

सदर रकमेची परतफेड करण्यात **कर्जदार** असमर्थ ठरल्याने, याद्वारे **कर्जदार** आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा** त्याला/तिला सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन ह्या **१६ मार्च, २०२४ रोजीस** घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **युनियन बँक ऑफ इंडिया,** वाशी सेक्टर १५ शाखेच्या रक्कम रु. ५,०४,१६९.९४ आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तांच्या भरणाकरीता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये ॲक्टच्या कलम १३ चे पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधुन घेतले जात आहे.

तारण मत्तांचे वर्णन:

तारणाचा तपशील: फ्लॅटक्र. १, इमारत क्रमांक १२, जीआय३ अष्टविनायक सीएचएस लि., प्लॉट क्र. १६, सेक्टर ६, घनसोली, नवी मुंबई-४००७०१.

दिनांक : १६.०३.२०२४
ठिकाण: वाशी

सही/–
प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India

रिजनल ऑफीस नाशिक : पी-63, सातपूर एमआयडीसी, नाशिक – 422007.
फोन क्र. 0253 - 2350475, **ईमेल :** recvnasiro@centralbank.co.in

[नियम 8(1)]
ताबा नोटीस
(स्थावर मालमत्तेकरिता)

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

खाली सही करणार सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अधिकृत अधिकारी बँकिंग कंपनीज (ॲक्विझिशन ॲन्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग) कायदा 1970 अन्वये स्थापन करण्यात आलेली कॉर्पोरेट कंपनी आहे. ज्याचे मुख्य कार्यालय चंद्रमुखी, नरिमन पॉईंट, मुंबई येथे आहे आणि **गोवर्धन** येथे शाखा कार्यालय आहे. सेक्युरिटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल असेटस् ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (54 ऑफ 2002) च्या कलम 13(2) सोबत सिक्यूरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 9 अंतर्गत बहाल केलेल्या अधिकारानुसार कर्जदार **श्री. नितीन प्रभाकर कदम आणि सौ. सविता नितीन कदम** यांना नमूद केलेल्या रक्कमेची **रू.1,70,663.37 (रूपये एक लाख सत्तर हजार सहाशे त्रेसष्ठ रूपये आणि सदोतीस पैसे + व्याज + चार्जस मात्र) दि.04/11/2022** रोजी परतफेड करण्यासाठी नोटीस पाठविण्यात आली होती. त्यात नमूद केल्यानुसार नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत नमूद केलेली संपूर्ण रक्कम, त्यावरील व्याज व इतर खर्चासहित परतफेड करने बंधनकारक होते.

कर्जदार वरिलप्रमाणे परतफेड करण्यात अपयशी ठरल्याने, कर्जदारास व सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की,खालील नमूद करण्यात आलेली मालमत्ता वरील कायद्याच्या कलम 13(4) आणि संबंधित नियमाच्या नियम 9 अंतर्गत बहाल केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील सही करणार यांनी **दि. 13 मार्च 2024** रोजी ताब्यात घेतलेली आहे.

कर्जदार आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावधगिरीचा इशारा दिला जात आहे की, सदर मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार करू नये, केल्यास असा व्यवहार सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाने नमूद केलेल्या रक्कमेची **रू.1,70,663.37 (रूपये एक लाख सत्तर हजार सहाशे त्रेसष्ठ रूपये आणि सदोतीस पैसे + व्याज + चार्जस मात्र)** पावेतो अशा बोजास अधीन राहिल याची नोंद घ्यावी.

आर्थिक मालमत्तेचे सुरक्षित मालमत्तेची पूर्तता सर्फेसी **(SARFAESI)** करण्यासाठी उपलब्ध वेळेनुसार कायद्याच्या कलम 13 च्या पोटकलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात आले आहे.

स्थावर मालमत्ता वर्णन

मालमत्ता व सर्व भुभाग जमिन सर्व्हे क्र.36/A वरील प्लॉट क्र.96, स क्षेत्रफळ 174.375 स्क्वे.मिटर बांधकाम असलेली मालमत्ता मु.कामटवाडे, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, जिल्हा नाशिक, दिनांक 17.07.2008 रोजी गहाण तारण नोंदणी करारानुसार श्री. नितीन प्रभाकर कदम यांचे मालकिची मालमत्ता, चतु:सिमा खालीलप्रमाणे –

पुर्वेकडे : 7.50 मिटर कॉलनी रस्ता
पश्चिमेकडे : प्लॉट क्र.95
उत्तरेकडे : प्लॉट क्र.106
दक्षिणेकडे : प्लॉट क्र.96 चा भाग

दिनांक : 12.03.2024
ठिकाण : नाशिक

नोट : इंग्रजीमधील नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.

प्राधिकृत अधिकारी
(सेंट्रल बँक ऑफ इंडीया)

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

रिजनल स्ट्रेस्ड असेट रिकव्हरी शाखा,
एमएमडब्ल्युआर, ६ वा मजला, बडोदा हाऊस,
दिवाण शॉपिंग सेंटरच्यामागे, एसव्ही रोड,
जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२
ईमेल: sarmmw@bankofbaroda.co.in

शुध्दिपत्रक

दिनांक १५.०३.२०२४ रोजीचा फ्री प्रेस जर्नल (पान २४) आणि नवशक्ति (पान १८) मध्ये प्रकाशित १३-०३-२०२४ दिनांकित कब्जा सूचनेसाठी शुध्दिपत्रक, ह्या संदर्भात मे. मोक्ष कंस्ट्रक्शनच्या खातेमध्ये मिळकतीचे नावमध्ये अमिता एम. जैन च्या ऐवजी अमिता एम. जैन आणि महीपाल बी. जैन याचे नावे.

सही/–

दिनांक: १६.०३.२०२४
ठिकाण: मुंबई

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

वकील - ए. ए. पाटील

वसई येथील श्रीमती. आर. एन. खान, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात

जाहीर नोटीस

रे. मु. नं. : १३६/१९८५
निशानी क्र. १११
पुढील तारीख : १८/०३/२०२४

श्रीमती. सुरजकली सरजुप्रसाद मिश्रा व इतर ७ ....वादी

विरुध्द

श्री. लालमणी बापूराव दूबे व इतर ५ ....**प्रतिवादी**

प्रति,

१. श्री. लालमणी बापूराव दूबे मयत तर्फे वारस
१/१. श्री. जयप्रकाश लालमणी दूबे
१/२. श्री. शेषधर लालमणी दूबे,दोघे,रा. संतोष भुवन, तांडापाडा, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर.

ज्या अर्थी सदरचे वादी यांनी मे. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर वसई यांच्या न्यायालयात सदरचा नियमित दिवाणी दावा क्र. १३६/१९८५ दाखल केला आहे.

त्याअर्थी असे जाहीर करण्यात येते की, सदरहु नियमित दिवाणी दावा मध्ये, उपनिर्दिष्ट प्रतिवादी यांच्यावर प्रत्यक्ष समन्स-नोटीसची बजावणी झालेली नसल्यामुळे ही जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत. तरी सदर प्रतिवादी अगर त्यांचे प्रतिनिधींनी त्यांची बाजु मांडण्यासाठी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा दिनांक **१८ माहे मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता** पर्यंत उपरनिर्दिष्ट प्रकरणी सामील होउन आपले लेखी म्हणणे नोंदवावे आणि तसेच या लेखावरून असे कळविण्यात येते की सदरहु मुदतीत आपले लेखी म्हणणे न आल्यास न्यायालय वादीचे म्हणणे ऐकुन प्रस्तुतच्या अर्जात निकाल देण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १४ माहे मार्च २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

SEAL

हुकुमावरुन,
सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, वसई

PUBLIC NOTICE

Notice is Hereby Given That Mrs. Aviva Suresh Choksey (the "Owner") is the owner of and/or seized and possessed off and/or otherwise well and sufficiently entitled to the under mentioned Residential Premises.

The Owner have agreed to sell, transfer and assign the under mentioned Residential Premises and all the rights, title, interests, benefits, shares etc. In respect thereof to my client.

Any person/entity having any claim/objection in respect of the under mentioned Residential Premises or any portion or part thereof including claim/objection as and by way of sale, exchange, mortgage, gift, lien, trust, lease, possession, inheritance, easement, license or otherwise howsoever are hereby required to make the same known in writing along with certified true copy of supporting documents to the undersigned at the address mentioned below within 15 days from the publication hereof, otherwise, the same, if any, will be considered as waived and the transaction between the Owner and my client in respect of the under mentioned Residential Premises will be completed.

The Schedule of Property:

Residential Premises Flat no. 7 admeasuring about 440 sq. ft. Carpet area on the 3 Floor. in the building of the society known as Sutrim Co-perative Housing Society Limited Situated on land bearing Final Plot no. 109 of T.P.S. VII, C.T.S. No. E/644,10th Road, Khar West, Mumbai 400052. within the Local Limits of H/West Ward of Mumbai Municipal Corporation in the registration district of Mumbai Suburban District, Mumbai.

Place: Mumbai.
Date: 17/03/2024.

Sd/-
Mr. Mitesh Shah
Advocate High Court
96, Kadri Park, S.V. Road, Irla, Vile Parle(W), Mumbai-400056

जाहीर नोटीस

तमाम जनतेस हया नोटीसीव्दारे कळविण्यात येते की गाव मौजे दिवाणमान, ता. वसई, जि. पालघर येथिल सर्व्हे क्र. ६ हिस्सा क्र. ३, ४ व ६ हया जमिन मिळकतीमध्ये आमचे अशिल सौ. वनिता नितीन भोईर हयांचा दि. २६.०८.२००३ रोजीच्या नोंदणीकृत कायम खरेदीखताव्दारे १. श्री. लवा रामचंद्र पाटील,२. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हयांचे सोबत १/२ असा संयुक्तिक मालकी कब्जेवहिवाट आहे. सदर मिळकतीबाबत आमचे अशिल सौ. वनिता नितीन भोईर हयांनी १. श्री. लवा रामचंद्र पाटील, २. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हयांचेविरूध्द वसई येथिल मा. दिवाणी न्यायाधिश व. स्तर हयाचे न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र. ६७/ २०११ दाखल केलेला. सदर दाव्यात १. श्री. लवा रामचंद्र पाटील, २. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हयांनी देखिल त्यांचा प्रतिदावा निशाणी क्र. २८ वर दाखल केलेला आहे. सदर दाव्यात दि. ०४.०१.२०२३ रोजी वसई येथिल मा. दिवाणी न्यायाधिश व. स्तर हयांनी आदेश पारीत करून आमचे अशिल सौ. वनिता नितीन भोईर हयांचा दावा व १. श्री. लवा रामचंद्र पाटील, २. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हयांचा देखिल प्रतिदावा फेटाळलेला आहे. आमचे अशिल सौ. वनिता नितीन भोईर हयांनी वसई येथिल मा. दिवाणी न्यायाधिश व. स्तर हयांचेकडील विशेष दिवाणी दावा क्र. ६७/ २०११ मधील दि. ०४.०१.२०२३ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरूध्द वसई येथील मा. अति जिल्हा व सत्र न्यायाधिश हयांचे न्यायालयात नियमित अपिल क्र. १८/२०२३ दाखल केलेले असुन १. श्री. लवा रामचंद्र पाटील, २. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हयांनी देखिल त्यांचा प्रतिदावा फेटाळल्याबाबत सदर आदेशाविरूध्द वसई येथिल मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश हयांचे न्यायालयात नियमित अपिल क्र. १९/२०२३ दाखल केलेले आहे. सदर दोन्ही नियमित अपिल क्र. १८/२०२३ व १९/२०२३ हे न्यायालयात प्रलंबित आहेत.आमच्या अशिलांना असे कळाले आहे की १. श्री. लवा रामचंद्र पाटील, २. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हे सदर मिळकत ही त्रयस्थ इसमांना हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. १. श्री. लवा रामचंद्र पाटील, २. श्री. निनाद नंदकुमार राणे, ३. श्री. देवदत्त नंदकुमार राणे हे वरील नमुद सदर मिळकतीचे एकमेव मालक नसल्यामुळे त्यांना इतर त्रयस्थ व्यक्तींशी व्यवहार करण्याचा कोणताही कायदेशिर अधिकार नाही. तरीही आमचे अशिलांच्या संम्मती शिवाय कुणीही कोणत्याही प्रकारे वरील नमुद मिळकतीबाबत व्यवहार करू नये, तसे केल्यास सदरचा व्यव्हार हा बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हयाची कृपया नोंद घ्यावी.

आपला

श्री. जगजीत प्रदिप हातोडे, वकील

ठिकाण: वसई दिनांक: १७/०३/२०२४